## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ ची साक्ष

## निशाणी क्र.२४

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – आसाराम सोनु वाडीले,

वय – ६३ वर्षे,

व्यवसाय – सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक,

सध्या राहणार – शिरपुर, ता. शिरपुर, जि. धुळे.

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. दि. ०६.०६.२०१८ रोजी मी दोंडाईचा पोलीस ठाणे येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. त्यादिवाशी गु.र.क्र. ५१/२०१८ हया गुन्हयाचा तपास माझ्याकडे सोपविण्यात आला. तपासाचा आदेश लेखी होता. (आता साक्षीदारास गुन्हयाचा तपासाबाबतचा लेखी आदेश दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आालेला आदेश तोच आहे. त्याच्यावर ठाणे अंमलदार पोहेकॉ. मराठे यांची सही आहे. ती समक्ष केली असल्याने मी ओळखतो. सदर आदेशातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर आदेशास **नि. २५** देण्यात येते.)

०२. सोनगीर ते दोंडाईचा रस्त्यावर अपघात झाला होता. त्यातील जखमीस कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा येथे दाखल करण्यात आले होते. तेथे त्याचा मृत्यु झाला. मृत्यु झाल्याबाबत त्याचा भाऊ यशवंत मिठाराम याने फिर्याद दाखल केली होती. तपासाच्या आदेशासह मला फिर्याद मिळाली होती. त्यानंतर मी दवाखान्यात गेलो व गुन्हयातील मयत याचेवर इन्क्वेस्ट पंचनामा केला. त्यानंतर मेडीकल ऑफीसर यांना पी. एम. होण्याबाबत पत्र दिले. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील पत्राची स्थळप्रत दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेले पत्राची स्थळप्रत ही त्याच पत्राची आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर मेडीकल ऑफीसर यांना दिलेल्या पत्राचे

स्थळप्रतीस **नि. २६** देण्यात येते.)

०३. तदनंतर मी घटनास्थळी गेलो व तेथे दोन पंचांना बोलावुन त्यांचे समक्ष सघटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळाचा पंचनामा दि. ०६.०६.२०१८ रोजी १६.०० वाजता केला. पंचांची नावे संजय नामदेव पाटील व महेंद्र रमेश पाटील अशी होती. घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते. घटनास्थळ दोंडाईचा ते सोनगीर रस्त्यावर संतोष पेट्रोल पंप व साईप्रसाद हॉटेल यांचेसमोर रस्त्यावर होते. मयताला डोक्याला मार लागल्याने त्याचे रक्त रस्त्यावर सांडले होते. तसेच टायर माक्सचा निशाण होता. रस्त्यावर वाहनांचे प्लॅस्टीकचे तुकडे व काचा वगैरे पडले होते. अपघातामध्ये ४०७ गाडी व स्पलेंडर मोटारसायकल होती. ४०७ गाडीवर ठोस मारल्याच्या निशाणी होत्या. मोटरसायकलचे नुकसान झाले होते व त्याचा पुढचा शो तुटला होता. घटनास्थळावर वाहनांचे फोटो काढुन घेण्यात आले होते. ते तपासकामात सामील केले. मी मालट्रकचे फोटो काढुन घेतले होते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील तीन फोटो दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेले फोटो हे तेच आहेत. (सदर तीन्ही फोटोंना ओळखीकरीता **आर्टीकल अ, ब व क** देण्यात येते. ) तसेच मी मोटरसायकलचे फोटो काढुन घेतले होते. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील तीन फोटो दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेले फोटो हे तेच आहेत. (सदर तीन्ही फोटोंना ओळखीकरीता **आर्टीकल ड, इ व फ** देण्यात येते. ) घटनास्थळाच्या पुर्वेस व पश्चिमेस दोंडाईचा ते सोनगीर रस्ता होता. तसेच उत्तरेला संतोष पेट्रोल पंप व साईप्रसाद हॉटेल होते व दक्षिणेस रिकामी शेती होती. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा हा तोच आहे. सदर पंचनाम्यावर माझी व पंचांच्या अशा सहया आहेत. पंचांनी त्या माझ्यासमक्ष केल्याने मी ओळखतो. पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर घटनास्थळ पंचनाम्यास **नि. २७** देण्यात येते.)

०४. त्यानंतर मी गुन्हयातील साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले. मी आरोपीला ४१-अ प्रमाणे नोटीस दिली होती. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील

फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणेची नोटीस दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली नोटीस तीच आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर नोटीसीस **नि. २८** देण्यात येते.) त्यानंतर मी आरोपीस मो.वा.का. कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील मो.वा.का. कलम २०९ प्रमाणेची नोटीस दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली नोटीस तीच आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर नोटीसीस **नि. २९** देण्यात येते.) तदनंतर मी दोन्ही वाहनांचा तपासणीकरीता आरटीओ कार्यालयास पत्र दिले. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील पत्राची स्थळप्रत दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेले पत्राची स्थळप्रत ही त्याच पत्राची आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर आर.टी.ओ. ऑफीस यांना दिलेल्या पत्राचे स्थळप्रतीस **नि. ३०** देण्यात येते.) त्यानंतर मी तपासणीबाबतची प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेतली. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील वाहन तपासणी प्रमाणपत्रे दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेली प्रमाणपत्रे ही तिच आहे. त्याच्यावर आरटीओ साहेबांच्या सहया आहेत. (सदर दोन्ही प्रमाणपत्रांना ओळखीकरीता **आर्टीकल ग व ह** देण्यात येते. ) त्यानंतर गुन्हयातील वाहने सुपूर्दनामा घेवुन त्यांच्या मालकांना परत दिली. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील नि. क्र. ०९ कडील स्पलेंडर मोटरसायकलबाबतचा सुपूर्दनामा दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला सुपूर्दनामा हा स्पलेंडर मोटरसायकलबाबतचा आहे. त्याच्यावर माझी सही आहे. तसेच त्याच्यावर मोटरसायकल मालकाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील ४०७ गाडीबाबतचा सुपूर्दनामा दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला सुपूर्दनामा हा ४०७ गाडीबाबतचा आहे. त्याच्यावर माझी सही आहे. तसेच त्याच्यावर ४०७ गाडी मालकाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर सुपूर्दनाम्यास **नि. ३१** देण्यात येते.)

०५. त्यानंतर मी पी. एम. रिपोर्ट प्राप्त केला. तो कामामध्ये सामील केला. तपास पुर्ण झाल्यावर आरोपीविरुध्द पुरावा गोळा झाल्याने त्याचेविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकेन. आरोपी आज रोजी न्यायालयासमक्ष

हजर नाही. (आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज व गैरहजेरीमध्ये काम चालविणेबाबत पुरसिस अनुक्रमे नि. क्र. २२ व २३ कडे दाखल आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. जी. पाटील यांचे मार्फत.</u>**

०६. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी ज्ञानेश्वर मिठाराम याने ऐकीव माहितीच्या आधारे फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, कुणाल धोंडु पाटील याने दुरध्वनीवरुन दिलेल्या माहितीच्या आधारे ज्ञानेश्वर मिठाराम याने फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, कुणाल धोंडु पाटील याचा जबाब मी नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या साक्षीदारांचे जबाब तपासादरम्यान नोंदविले आहेत ते सर्व मयताचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर साक्षीदारांपैकी कोणीही साक्षीदार प्रत्यक्षदर्शी नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोंडाईचा ते सोनगीर रस्ता हा राज्य महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, सोलापुर व संभाजीनगर येथुन गुजरात व मध्यप्रदेशकडे जाण्याकरीता वाहतुक त्याच मार्गाने होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदर रस्ता वर्दळीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजूला संतोष पेट्रोल पंप, हॉटेल साईप्रसाद व पंक्चरचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर पंप, हॉटेल व पंक्चर दुकानावरील लोकांचे जबाब नोंदविलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रमोद लोटन पाटील हा अपघातातील वाहन चालवित होता हे एकाही साक्षीदाराने मला सांगितले नव्हते.

०७. हे म्हणणे खरे आहे की, ४०७ गाडीच्या पुढील भागास कॅबीन म्हणले जाते व पाठीमागील बॉडीस फालके असतात. हे म्हणणे खरे नाही की, अपघातातील ४०७ गाडीचा पुढील भाग हा शाबुत होता व त्यास काहीही लागले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मयत यशवंत मिठाराम पाटील व जगन विक्रम पाटील यांचे वाहन चालविण्याबाबतचे परवाने मी प्राप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, यशवंत मिठाराम पाटील व जगन विक्रम पाटील यांचे वाहन चालविण्याबाबतचे परवाने तपासादरम्यान न मिळाल्याने मी ते सदर कामी सामील केलेले

नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील टायर्सचे निशाण हे कोणत्या वाहनाच्या आहेत याबाबत मी तज्ञ म्हणजेच आरटीओ कार्यालय यांचेकडून अहवाल घेतलेला नाही. मी आरोपी प्रमोद लोटन पाटील याचा जबाब नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी प्रमोद लोटन पाटील याच्या जबाबाप्रमाणे मी पडताळणी तपास केला नाही.

०८. हे म्हणणे खरे नाही की, मी तपासादरम्यान इन्वेस्ट पंचनामा केला, घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, अपघातातील वाहनांची तपासणी करुन घेतली, त्यांचे फोटो काढले हे सर्व मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा सदर गुन्हयामध्ये कोणताही दोष नसतांना केवळ जखमींचा मोटर अपघात दावा मंजुर व्हावा हया उद्देशाने मी चुकीचा तपास करुन खोटे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयासमक्ष खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.03.31 13:37:21 +0530

दिनांक : ३०/०३/२०२६
स्थळ : दोंडाईचा

(आदित्य घ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव - जी. एस. अहिरे,

न्यायालयाचे नांव - न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. - ३१.०३.२०२६.

स्वाक्षरित/-

लघुलेखक (श्रेणी-३)